# Nature Conservation Society

NACONS

CONSERVING NATURE. SUSTAINING LIFE.

# संस्थेचा परिचय

नोंदणी क्र.– Mah/386/08, F-13502/Sangli

# आमच्याबद्दल थोडेसे...

नेचर कॉन्झर्वेशन सोसायटी (नेकॉन्स) ही ई.स.२००८ सालापासून निसर्ग आणि पर्यावरण संवर्धन क्षेत्रात विना नफा तत्वावर काम करणारी स्वयंसेवी संस्था आहे.

## नेकॉन्सचा दृष्टीकोन

संकटग्रस्त नैसर्गिक परिसंस्थाचे जतन करणे, पर्यावरणीय कार्बन पदचिन्ह कमी करणे, आशावादी व व्यावहारिक पध्दतीने सातत्यपूर्ण प्रयत्न करून माणूस आणि पृथ्वीतलावरील अन्य सर्व सजीव यांचे शांततामय सहजीवन सुकर करणे.

## नेकॉन्सचे ध्येय

निसर्गाचे संवर्धन करणे आणि मानवी समाज व निसर्ग यांच्यात समन्वय साधून शाश्वत भविष्य निर्माण करणे.

## नेकॉन्सचा पूर्वेतिहास

ई.स.२००८ साली वेगवेगळया व्यावसायिक क्षेत्रात काम करणाऱ्या, परंतु निसर्ग संवर्धनाच्या कार्यात स्वतःचे योगदान देऊ इच्छिणाऱ्या तरूण, समविचारी आणि ध्येयासक्त लोकांनी एकत्र येऊन नेचर कॉन्जर्वेशन सोसायटीची स्थापना केली. वन्यजीवांचे बचावकार्य आणि पुनर्वसन या कामापासून सुरू झालेल्या संस्थेच्या या प्रवासाचे रूपांतर हळूहळू एका निरंतर चालणाऱ्या यात्रेत झाले आणि गेल्या १५ वर्षाहून अधिक काळ संस्थेने अधिवास संवर्धन, पारंपरिक वृक्षारोपण, जनप्रबोधन, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण संशोधन अशा निसर्ग संवर्धनाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध विषयांवर काम केले.

Nature Conservation Society

# संस्थेचे कार्य हे मुख्यतः खालील महत्वाच्या विषयांभोवती केंद्रीत झालेले आहे.

## नेकॉन्सचे कार्य



वन्यजीवन



भटकी जनावरे



हरित आच्छादन



अधिवास




प्रबोधन



संशोधन




घनकचरा

पुढील स्लाईडस् मध्ये आपण या कार्याची तपशीलवार माहिती घेणार आहोत.

# माणूस - वन्यजीव संघर्षाची तीव्रता कमी करणे

- गेल्या काही दशकात झालेली बेसुमार जंगलतोड, शहरीकरण, औद्योगिकीकरण, शेती इत्यादींमुळे वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास सातत्याने नष्ट होत असून त्यामुळे भरकटलेले वन्यजीव मानवी वस्तीत येण्याचे प्रमाण वाढते आहे. परिणामी माणूस - वन्यजीव संघर्षही वाढत चालला आहे. वन्यजीवांची चोरटी शिकार आणि तस्करी यामुळे हा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.
- टीम नेकॉन्स अशा वन्यजीवांशी संबधित आपत्कालीन परिस्थितीस तोंड देण्यासाठी नेहमीच तयार आणि सुसज्ज असते. संस्थेचे बचावकर्ते तत्परतेने घटनास्थळी पोहोचतात, संकटग्रस्त वन्यजीवाची सुटका करतात, गरज पडल्यास जखमी प्राण्यावर वैद्यकीय उपचार करतात आणि शेवटी त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करतात. हे बचावकार्य नेहमी स्थानिक वनखात्याच्या सहकार्याने आणि समन्वयाने केले जाते.



बचाव केलेला एक बिबट



बचाव केलेली एक गोडया पाण्यातील मगर



बचाव केलेले एक खवल्यामांजर



एका सापाचे अवघड आणि जोखमीचे बचावकार्य

# जखमी वन्यजीवांवर वैद्यकीय उपचार

- बचावकार्य सुरू असताना बऱ्याच वेळेस वन्यजीव थकतात, तहान व भुकेने व्याकुळ होतात आणि धडपड करत स्वतःला इजा करून घेतात. अनेकदा उच्च भाराच्या विजेच्या तारा, पतंगाचा मांजा, रस्त्यावरील अपघात, उघडया विहिरीत पडणे यामुळेही वन्यजीव गंभीररित्या जखमी होतात.

- अशा वन्यजीवांना विशेष वैद्यकीय उपचारांची गरज असते आणि कधीकधी तर त्यांच्यावर शस्त्रक्रिया सुध्दा कराव्या लागतात. टीम नेकॉन्स पशुवैद्यकीय तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीने अशा प्राण्यांवर उपचार करते.



जमावाच्या मारहाणीत जखमी झालेला एक नाग



हाताला विजेचा धक्का बसलेले एक हनुमान लंगुर वानर



पतंगाच्या मांज्यात अडकडून जखमी झालेली घार



विजेच्या तारेमुळे जखमी झालेले एक फलाहारी वटवाघूळ.

# वन्यजीवांसाठी पिजऱ्यांची निर्मिती

- अनेकदा माणूस  - वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी बिबट, अस्वल, माकड इत्यादी वन्यजीवांना जेरबंद करावे लागते. जर पिंजऱ्यांची निर्मिती प्रमाणबध्द पध्दतीने केलेली नसेल तर वन्यप्राणी पिंज-यात अडकताना जखमी होण्याची शक्यता असते.

- म्हणूनच नेकॉन्स संस्था वन्यजीवांसाठी सापळा पिंजरे आणि वाहतुक  पिंजऱ्यांची निर्मिती करते. वन्यप्राण्यांचे नैसर्गिक वर्तन आणि त्यांची सुरक्षितता विचारात घेवून आणि प्रत्येक प्राण्याच्या विशिष्ट गरजा लक्षात घेवून या पिंजऱ्यांची आखणी व निर्मिती केली जाते.
आजपर्यंत महाराष्ट्र राज्यातील सांगली वनविभाग आणि छत्तीसगड राज्यातील मणेंद्रगड वनविभाग यांना असे अनेक पिंजरे संस्थेने बनवून दिलेले आहे.



बिबट /अस्वल यासाठीचा सापळा पिंजरा.



माकड पकडण्याचा सापळा पिंजरा




घडी घालून वाहतूक करण्याचा सापळा पिंजरा



छोटया जनावरांसाठीचे वाहतूक  पिंजरे

Nature Conservation Society

# भटक्या जनावरांचे बचावकार्य

- भटक्या जनावरांचे बचावकार्य हा विषय जरी निसर्ग संवर्धन क्षेत्राच्या कक्षेत येत नसला तरी कधीकधी लोकांच्या विनंतीला मान देऊन नेकॉन्स संस्था संकटग्रस्त भटक्या जनावरांचे बचावकार्य करते. बऱ्याचदा असे प्राणी त्यांच्याा मालकांकडून होणारी हेळसांड किंवा अत्याचार याला बळी पडलेले असतात. आवश्यक असल्यास संस्था अशा प्राण्यांवर वैद्यकीय उपचारही करते.
- भटक्या कुत्र्यांची संख्या बेसुमार वाढली की पुढे त्यांच्या छोटया छोटया टोळया बनतात आणि आक्रमक होऊन त्या भागातील रहिवासी माणसे आणि सभोवतालचे वन्यजीव यांच्यावर हल्ले करतात. म्हणूनच नेकॉन्स संस्था देशी कुत्र्यांच्या पिल्लांना दत्तक घेणे, भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण इ. कार्यक्रमांना नेहमीच प्रोत्साहन देते.



टाकाऊ डांबरामुळे जखमी झालेले कुत्र्याचे पिल्लू



आतडीत प्लॅस्टीकच्या पिशव्या अडकलेली एक गाय



बचाव केलेले एक मांजराचे पिल्लू



चुकीच्या आहारामुळे आतडी सुजलेला एक घोडा

Nature Conservation Society

# पारंपरिक वृक्षारोपण आणि वनीकरण

- शेतीचा विस्तार, शहरीकरण ,औद्योगिकीकरण, खाणकाम इत्यादीमुळे झालेली बेसुमार जंगलतोड हा आता एक गंभीर जागतिक प्रश्न बनलेला आहे. त्याचे दृश्य परिणाम आता अतिरिक्त कार्बन उत्सर्जन, त्यामुळे होणारी वैश्विक तापमानवाढ, दुष्काळ, जंगलांना वारंवार लागणारे वणवे, झपाटयाने वितळणाऱ्या हिमनदया, समुद्राची वाढती पातळी, अवकाळी पाऊस, अचानक येणारे पूर आणि त्यातून होणारा जैवविविधतेचा विनाश या स्वरूपात दिसत आहेत.
- हे सर्व रोखण्यासाठी पृथ्वीवरील हरित आच्छादन वाढविण्याचे जे जागतिक प्रयत्न सुरू आहेत त्यात योगदान देण्याचा प्रयत्न टीम नेकॉन्स करते. यासाठी शाळकरी मुले, महाविदयालयीन विदयार्थी आणि सामान्य नागरिक यांच्यामार्फत शहरी आणि ग्रामीण वृक्षारोपणाचे कार्यक्रम संस्था राबवित असते. तसेच, जंगलतोड झालेल्या किंवा नापीक, पडीक अशा जमिनीवर जलद वनीकरण करण्यासाठी संस्था 'क्लस्टर पध्दत, मियावाकी पध्दत' अशा वनीकरणाच्या आधुनिक पध्दतींचा वापरही करते.



शहरी वृक्षारोपण प्रकल्प



ग्रामीण वृक्षारोपण प्रकल्प




मियावाकी शहरी वनराई प्रकल्प, मिरज




मियावाकी शहरी वनराई प्रकल्प, कुपवाड

Nature Conservation Society

# वृक्षांचे अपारंपरिक संवर्धन

- रस्त्याकडेचे मोठे वृक्ष जमिनीची धूप थांबवितात, आपल्याला सावली देतात आणि उन्हाळयात तापलेल्या रस्त्यांमधून बाहेर पडणा-या उष्णतेचे प्रमाण कमी करतात. तसेच ते वन्य पशुपक्ष्यांना अन्न आणि निवारा सुध्दा उपलब्ध करून देतात. दुर्दैवाने, रस्ते रूंदीकरणाच्या कामात सर्वात पहिला बळी या झाडांचा दिला जातो.
- नेकॉन्स संस्था विविध मार्गांनी या वृक्षांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करते. जिथे शक्य असेल तिथे रस्त्याच्या आराखडयात बदल करून झाडे वाचविण्यासाठी सरकार दरबारी प्रयत्न केले जातात. हे शक्य नसेल तर त्यातील महत्वाच्या झाडांचे अन्यत्र पुनर्रोपण करण्याचा प्रयत्न केला जातो. काही ठिकाणी झाडे तोडणे अनिवार्यच असेल त्या झाडांवर आश्रय घेणाऱ्या ऑर्किड सारख्या पर्यावरणीय दृष्टया महत्वाच्या वनस्पतींचे अन्य झाडांवर पुनर्रोपण केले जाते.



मोठया वृक्षांचे पुनर्रोपण



वारसा वृक्षांचे संवर्धन


भिंतीवर उगवलेल्या झाडांचे जमिनीत पुनर्रोपण


ऑर्किड पुनर्रोपण प्रकल्प

Nature Conservation Society

# नैसर्गिक अधिवासांचे संवर्धन

- जलद गतीने होणारे औद्योगिकीकरण आणि इमारतीचे बांधकाम प्रकल्प यासाठी केल्या जाणाऱ्या जमीन अधिग्रहणामुळे घनदाट जंगले तसेच गवताळ प्रदेश, झुडपी जंगले, दलदली या बिगर जंगली अधिवासांना मोठा धोका उत्पन्न झालेला आहे. हे प्रदेश विभिन्न प्रकारच्या पशुपक्ष्यांच्या आणि वनस्पतींच्या प्रजातींसाठी आश्रयस्थाने आणि अन्नाचे स्त्रोत असतात. तसेच या अधिवासांमध्ये झालेल्या परदेशी जातींच्या प्राणी आणि वनस्पती यांच्या अतिक्रमणांमुळे ही समस्या अधिकच गंभीर बनते आहे.
- नेकॉन्स संस्था या विषयाबद्दल सर्वसामान्य लोकांचे सातत्याने प्रबोधन करून नैसर्गिक अधिवासांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करते.



दलदल - एक महत्वाची बिगर जंगल परिसंस्था



भारतीय नद्यांमध्ये झालेली विदेश जातीच्या माशांची घुसखोरी



गवताळ प्रदेशाचे जैवविविधता सर्वेक्षण



प्रबोधनाच्या माध्यमातून अधिवासांचे संवर्धन

# जनप्रबोधन

- निरंतर दिले जाणारे पर्यावरण शिक्षण आणि सर्वसामान्य लोकांचे प्रबोधन हेच असे शाश्वत मार्ग आहेत ज्याच्या आधारे निसर्ग संवर्धनाच्या प्राथमिक पातळीवरील प्रयत्नांचे रूपांतर एका मोठया लोकचळवळीत करता येऊ शकते.
- म्हणूनच शाळकरी मुले आणि महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यासाठी पर्यावरण शिक्षण कार्यशाळा आयोजित करणे, शहरी आणि ग्रामीण लोकांसाठी दृक - श्राव्य माध्यमे वापरून केलेले कार्यक्रम, रेडिओ आणि टीव्हीवरील कार्यक्रम, मासिके आणि वर्तमानपत्रातील लेख, समाज माध्यमांवरचे लेख, वन्यजीव अभ्यास सहली, सायकल रॅलीज इत्यादी मार्गांनी संस्था जनप्रबोधनाचे कार्य करते.




शाळकरी मुलांसाठी प्रबोधनाचे कार्यक्रम




रेडिओवरील कार्यक्रम




छोटया माहिती पुस्तिका




मासिकांमधील लेख

Nature Conservation Society

# घनकचरा व्यवस्थापन

- घनकचरा व्यवस्थापन ही एक जागतिक समस्या बनलेली आहे. रस्त्यांवर साचणाऱ्या कचऱ्यामुळे पावसाळयात नाले व गटारी तुंबतात आणि त्यामुळे शहरातील पूरस्थिती गंभीर बनते. जगभरातील समुद्र विघटन न होऊ शकणाऱ्या कचऱ्यामुळे भरून जात आहेत. कचरा जाळल्यामुळे हवेचे प्रदूषण आणि माणसाला श्वसनाचे विकार हे दोन्हीही होतात. गरीब किंवा श्रीमंत अशा दोन्ही प्रकारच्या देशांच्या आर्थिक प्रगतीत कचरा हा एक मोठा अडथळा आहे.
- यासाठी टीम नेकॉन्स ही सरकारी संस्था, स्वयंसेवी संस्था, सर्वसामान्य नागरिक यांना जैवविघटनशील आणि अ-जैवविघटनशील कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन कसे करावे याबद्दल मार्गदर्शन करते.




स्वयंपाकघरातील घरगुती कचऱ्याचे विघटन



शेती, पशुपालन व्यवसायातील कचऱ्याचे विघटन




प्लॅस्टीक कचरा संकलन मोहीम




निर्माल्य संकलन मोहीम

Nature Conservation Society

# संशोधन

- आपण आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात आपले आयुष्य जगतो आणि पर्यावरणातील नैसर्गिक जीवनस्त्रोतांचा उपयोग पृथ्वीवरील अन्य सजीवांबरोबर सामायिकपणे करतो. म्हणूनच आपल्या पर्यावरणाचे संवर्धन कसे करावे आणि त्यासाठी पृथ्वीवरील अन्य सजीवांबरोबर सहजीवन कसे जगावे याचे ज्ञान आपल्याला पर्यावरणशास्त्राच्या अभ्यासातून मिळते.
- त्यामुळे नेकॉन्स टीमचे काही सदस्य पर्यावरण संशोधनात सक्रिय सहभाग घेतात. संशोधनाचा मुख्य रोख हा 'सजीवांच्या नवीन प्रजातींचा शोध' आणि 'माणूस - वन्यजीव संघर्षाचे व्यवस्थापन' या विषयांवर असतो.




प्रत्यक्ष अधिवासातील संशोधन कार्य



प्रयोगशाळेतील संशोधन




पालीच्या एका नवीन प्रजातीचा शोध




कोळयाचा एका नवीन प्रजातीचा शोध


# पुरस्कार

## नेचर कॉन्जर्वेशन सोसायटीला आजवर अनेक सन्माननीय पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

## यापैकी काही महत्वाचे पुरस्कार पुढीलप्रमाणे ...




'किर्लोस्कर वसुंधरा मित्र पुरस्कार २०११'



' भारताचे जलपुरूष डॉ.राजेंद्रसिंह राणा यांच्या हस्ते विशेष सन्मान '



' स्व. सौ.रोहिणी जाधव निसर्ग - पर्यावरण मित्र पुरस्कार २०२१'

Nature Conservation Society

# आम्हाला तुमचे सहाय्य हवे !

**टीम नेकॉन्स निसर्ग संवर्धनाचे काम विविध पातळयांवर आणि अविरतपणे करत असते.**
**आमच्या ध्येयपूर्तीसाठी आम्हाला तुमच्या उदार आर्थिक सहाय्याची गरज आहे.**

## तुम्ही दिलेली देणगी ही पुढे नमूद केलेल्या संस्थेच्या विविध भविष्यकालीन उपक्रमांसाठी उपयुक्त ठरेल.



**संकटग्रस्त प्राण्यांचे बचावकार्य**




**जखमी जनावरांसाठी निवारा व उपचार केंद्र**




**जनप्रबोधन मोहीम**



**देशी झाडांच्या बियांचे संकलन केंद्र**



**देशी वृक्षांची रोपवाटिका**




**पर्यावरण शिक्षणासाठी ग्रंथालय**

Nature Conservation Society

# कृपया आमच्या कार्याला अर्थसहाय्य करा !

आमच्या कार्याला तुमच्या आर्थिक पाठबळाची आवश्यकता आहे. तुमच्या योगदानामुळे संस्थेचे कार्य वृध्दींगत होईल. पुढील माहितीच्या आधारे तुम्ही संस्थेला देणगी देऊ शकता.

## उत्पन्न करमाफी विषयक कायदेशीर बाबींचा तपशील

नेचर कॉन्जर्वेशन सोसायटी ही विना नफा तत्वावर काम करणारी नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून या संस्थेला दिली जाणारी देणगी ही प्राप्तीकर अधिनियम १९६१ च्या सेक्शन 80 G अंतर्गत करमाफीस पात्र ठरते. संस्थेचा 80 G प्रमाणपत्र नोंदणी क्रमांक AAAAN9980BF20221 (दिनांक १२-०५-२०२२) असा असून त्याअन्वये कोणत्याही भारतीय देणगीदारास प्राप्तीकरात सूट मिळू शकते.

### संस्थेच्या बँक खात्याचा तपशील पुढीलप्रमाणे

| | |
|---|---|
| Bank Name | State Bank of India |
| A/C Holder Name | Nature Conservation Society |
| A/C Number | 41229907504 |
| Type of Account | Current account |
| IFSC Code | SBIN0000471 |
| PAN Card Number | AAAAN9980B |

किंवा

### तुम्ही खालील QR Code स्कॅन करून देखील संस्थेला देणगी देऊ शकता.

yono SBI | SBI Payments

MERCHANT NAME: NATURE CONSERVATION SOCIETY
UPI ID: NACONSSANGLI@SBI

SCAN & PAY

BHIM SBI Pay

BHIM UPI

Nature Conservation Society

**संस्थेबद्दल अधिक माहिती मिळविण्यासाठी**

**www.nacons.org**

**या आमच्या वेबसाईटला अवश्य भेट द्या.**

---

**तुम्ही आम्हाला खालील समाजमाध्यमांवर फॉलो करू शकता...**

https://www.facebook.com/Nacons

https://youtube.com/@nacons?si=vGgPXvtOV3gAaRUA

Instagram: https://instagram.com/nacons_ngo?igshid=YmMyMTA2M2Y=

https://x.com/nacons_ngo?s=20

https://www.linkedin.com/in/nature-conservation-society-nacons-b252b4251

---


**आम्हाला संपर्क करण्यासाठी –**

मुख्य कार्यालय - 'जे. के. आर्टस्, ईदगाह मैदानासमोर, जुना बुधगाव रस्ता, सांगली ४१६४१६

ईमेल : nacons.info@gmail.com, info@nacons.org

**संपर्क क्रमांक :**

+९१ ९८८१२४७५२० +९१ ९५४५२२५०५०, +९१ ९९२१०३४५५५ (सांगली करीता)
+९१ ९५०३९१७१११, +९१ ९०९६३११११७, +९१ ८१४९७०४४६१(कोल्हापूर करीता)
+९१ ९४२११२७०६९, + ९१ ७३८७७४२८२७ (पुणे शहराकरिता)


## धन्यवाद !